# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपुर शहर परिमंडळ, नागपुर.

---

## प्रकरण क्रं. ग्रागानिमं/नाशप/०५८ /२०१०

अर्जदार : श्री मो. मुर्तुजा ऐनुल हक,
राहणार असांर नगर
मोमीनपुरा, नागपुर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
गांधीबाग विभाग,
नागपुर.

गणपुर्ती : १) श्रीमती के.के घरत,
सदस्य–सचिव

२) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या

–– आदेश ––

पारीत दि. ०२.०९.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक २९.०७.२०१० रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम २००६ कलम ६.४ प्रमाणे दाखल केलेला आहे.

<u>अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील</u> :–

१. अर्जदार मो. मुर्तुजा ऐनुल हक, रा. मोमीनपुरा, नागपुर यांनी कार्यकारी अभियंता गांधीबाग विभाग, म. रा. वि. वि. कंपनी मर्यादित, गैरअर्जदार यांच्या अंतर्गत असलेल्या शाखा कार्यालयात नवीन विद्युत जोडणी करिता अर्ज सादर केला होता. परंतु सदर जागेवर जुनी थकबाकी असल्या कारणास्तव गैरअर्जदाराने थकबाकी भरल्याशिवाय विज जोडणी देता येणार नाही असे अर्जदारास कळविले. त्यामुळे अर्जदाराने दिनांक २७.०४.२०१० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, संवसु मंडळ, नागपुर शहर प्रविभाग, मराविविकं मर्यादित, नागपुर, येथे आपला तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यावर नागपुर शहर प्रविभागतर्फे दिनांक १४.०७.२०१० च्या पत्राव्दारे अर्जदाराला कळविण्यात आले की थकबाकी भरल्याशिवाय नवीन विज जोडणी देता येत नाही तेव्हा विज जोडणी करीता थकीत रक्कम भरणे आवश्यक आहे. अर्जदाराला हे मान्य नसल्याने त्याने दिनांक १९.०७.२०१० रोजी मंचात गा–हाणे दाखल केले व विनंती केली की,

अ) अर्जदाराची आर्थिक स्थिती बरोबर नसल्याने तो थकबाकी भरू शकत नाही. कारण त्याने विजेचा वापर केलेला नाही. तेव्हा जुनी थकबाकी त्याला मजुर नाही त्यामुळे थकबाकी रद्द करून नवीन विज जोडणी देण्यात यावी.

२. अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या पत्रात असे नमुद केले आहे की, दि. १२.०४.२०१० रोजी, त्यांना उपकार्यकारी अभियंता, इतवारी उपविभाग, यांच्या तर्फे असे कळविण्यात आले की त्यांच्या जागेवर रू.६४,४०१/– इतकी थकबाकी आहे.

सदर थकबाकीशी त्यांचा काहीही संबंध नाही. अर्जदाराने मंचाला विनंती केली की त्यांची आर्थिक स्थिती नाजुक आहे.तसेच ज्या लोकांनी विजेचा वापर केलेला होता, ते तिथे सध्या राहत नाहीत, त्यामुळे थकबाकी न घेता त्या ठीकाणी नवीन विज जोडणी देण्यात यावी व थकबाकी रद्द करण्यात यावी.

३. दिनांक १३.०८.२०१० गैरअर्जदाराने मंचात उत्तर दाखल केले आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की अर्जदाराने ज्या जागेवर नवीन विज पुरवठयाकरीता अर्ज सादर केलेला आहे, त्या जागेवर श्री ऐनुल हक वाय अली या नांवाने विज जोडणी होती व ती कायमस्वरूपी खंडीत करण्यात आली होती. तसेच त्या जागेवर रू. ६४,४०१/— इतकी थकबाकी आहे. तेव्हा जर अर्जदार थकबाकी भरण्यास तयार असेल तर परिपत्रक क्रं. ९८ प्रमाणे ५०% व्याजाची रक्कमेची सुट देता येईल व उर्वरीत रक्कम रू. ५२,५०२.०४ भरल्यानंतर नवीन विज जोडणी देण्यात येईल. सदर माहीती ग्राहकास दिली आहे, परंतु ग्राहकाने कुठलाही प्रतिसाद दिला नाही.

४. दिनांक १६.०८.२०१० रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली दोन्ही पक्ष उपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे श्री गुप्ता, उपकार्यकारी अभियंता, गांधीबाग विभाग व श्री कन्हेरे, उपकार्यकारी अभियंता, इतवारी उपविभाग, हे उपस्थित होते. मो. मुर्तुजा यांनी आपली बाजु मांडताना सांगितले की त्या जागेवर असलेली थकबाकी त्यांना मान्य नाही, कारण तेथे विजेचा वापर त्यांनी केला नाही. मंचाने जेव्हा त्यांना विचारणा केली की जुन्या जोडणी वर विजेचा वापर कुणी केला होता?. त्यावर अर्जदाराने सांगितले की विज जोडणी त्यांच्या वडीलांच्या नावाने होती. त्यांनी मंचाला असेही सांगितले की त्या थकबाकीशी त्यांच्या काहीही संबध नाही व त्यांची आर्थिक परिस्थिती नाजुक असल्याने ते थकबाकी भरू शकत नाही. त्यामुळे थकबाकी माफ करून त्यांना नवीन विज जोडणी देण्यांत यावी.

५. मंचाने दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकले. तसेच मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरून असे स्पष्ट होते की अर्जदार ज्या जागेवर नवीन विज जोडणीची मागणी करीत आहे, त्या जागेवर अर्जदाराच्या वडीलांची विज जोडणी होती. तसेच गैरअर्जदारातर्फे नवीन विज जोडणी करीता अर्जदाराला एकुण थकबाकी रू. ६४,४००.७६/– मधुन ५० प्रतिशत व्याज माफ करून रू. ५२,५०२.०४ अशी रक्कम असलेले विद्युत देयक देण्यात आले आहे.

मंचाचे असे मत आहे की अर्जदार त्या जागेचा वारसदार आहे. तेव्हा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम, २००५ कलम १०.५ अनुसार "जर मृत ग्राहक किंवा जागेचा पूर्वीचा मालक / वहिवाटदार, जसे असेल तसे, यांनी विजेचा आकार किंवा विजेच्या आकाराशिवाय अन्य कोणतीही वितरण परवानेधारकास देय असलेली रक्कम अदा करणे बाकी राहिल असेल तर तो बोजा, जागा ज्या कायदेशीर प्रतिनिधी/कायदेशीर वारस किंवा जागेचा नवीन मालक/वहिवाटदार यांच्या नावे हस्तांतरीत झाली असेल, जसे असेल तसे यांच्यावर राहील आणि अशा कायदेशीर प्रतिनीधी /कायदेशीर वारस किंवा जागेचा नवीन मालक / वहिवाटदार यांच्याकडुन वितरण परवानाधारक वसुल करेल".

त्यामुळे अर्जदाराला सदर थकबाकी भरणे बंधनकारक आहे,

६. तसेच सुनावणीच्या दरम्यान मंचाच्या असे लक्षात आले की अर्जदार हा थकबाकी असलेला ग्राहकाचा मुलगा आहे. त्यामुळे थकबाकीशी त्यांचा कुठलाही संबंध नाही हे वक्तव्य मान्य करता येत नाही. तसेच आर्थिक परिस्थिती वगळता अर्जदार मंचाला स्पष्ट करू शकले नाही की, थकबाकीची त्याचा कुठलाही संबंध नाही. जरी विजेचा वापर अर्जदाराने केला नाही, परंतु सदर जागा वारसाहक्काने अर्जदाराला मिळाली असल्याने, अर्जदार सदर जागेवर असलेली थकबाकी

नाकारू शकत नाही, तेव्हा अर्जदाराची थकबाकी माफ करण्याची विनंती मंचाला मान्य नाही.

# आदेश

अर्जदाराची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

सही/–
(श्रीमती के.के. घरत)
सदस्य–सचिव

सही/–
(श्रीमती गौरी चांद्रायण)
सदस्या्

सदस्य–सचिव
(कार्यकारी अभियंता)
ग्राहक गा–हाणे निवारण मंच (ना.ष.प.)
म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर.